# पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.

काटारोड, सिव्हील लाईन, वाशिम,ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.०७२५२-२३४८३४
ई-मेल - sp.washim@mahapolice.gov.in
Website:www.washimpolice.gov.in


## प्रेस नोट

दिनांक :– ०६/०३/२०२४

**पोस्टे. वाशिम ग्रामीण ग्राम अंजनखेडा येथील सराईत "हातभटटीवाला" अजाबराव दत्ता पायघन याचेवर एमपीडीए कायदयान्वये स्थानबध्दतेची कारवाई.**

मा. पोलीस अधिक्षक श्री.अनुज तारे यांनी वाशिम जिल्हयातील सर्व प्रकारचे अवैध धंदे करणाऱ्या इसमांवर प्रभावी कारवाई करण्याचे त्यामध्ये विशेषत: अवैध हातभट्टी दारु,गाळप, वाहतुक, विक्री करणाऱ्याविरुध्द प्रभावी रेड करुन अवैध दारुचे व्यवसाय नष्ट करण्याचे व दारुबंदी मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे आदेश दिले होते. त्याच अनुषंगाने अवैध हातभट्टी दारुवाल्यांविरुध्द प्रभावी प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याचे दृष्टीने वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याकरीता सर्व ठाणेदार यांना आदेशित केले आहे.

पोस्टे वाशिम ग्रामीण हददीत राहणारा सराईत हातभटटीवाला **अजाबराव दत्ता पायघन, वय ४५ वर्ष रा. अंजनखेडा ता. जि.वाशिम** हा अंजनखेडा येथे गावठी हातभटटीची दारु तयार करुन परिसरात अवैधरित्या गावठी दारु विक्री करतो. त्याचे या दारु व्यवसायामुळे गावातील व परिसरातील लोक व्यसनाधिन होत असुन, त्यांचे या अवैध दारु विक्री धंदयामुळे तरुण पीढी व्यसनाधिन,अक्रियाशील, बेरोजगार होतात त्यामुळे त्यांचे आयुष्य उध्वस्त होत आहे. तसेच स्त्रिया व मुलींना छेडछाडीच्या यातना होत आहे, त्यांचे दहशतीमुळे महिला,मुली त्याचेविरुध्द तक्रार देत नाहीत. सराईत हातभटटीवाला **अजाबराव दत्ता पायघन, वय ४५ वर्ष रा.अंजनखेडा ता. जि.वाशिम** याने गावठी हातभटटीची दारु तयार करुन गाळणे,वाहतुक करणे, विक्री करण्यापासुन परावृत्त व्हावे स्त्रिया,मुली यांचे संरक्षण व्हावे,व्यसनापासुन मुले,व्यक्ती यांना मुक्ती मिळावी, सार्वजनिक सुव्यवस्थेत बाधा उत्पन्न न होण्यासाठी नमुद इसमास महाराष्ट्र झोपडपटटी दादा, हातभटटीवाले व औषधीद्रव्ये विषयक गुन्हेगार,व्हिडीओ पायरेटस,वाळु तस्कर व अत्यावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ (सुधारणा १९९६,२००९ व २०१५) चे कलम ३(१) अन्वये कार्यवाही करुन स्थानबध्द करण्याबाबत स्थानबध्दतेचा (एमपीडीए) प्रस्ताव मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये यांचा एम.पी.डी.ए कायद्यान्वये प्रस्ताव तयार करण्यात आला. सदर प्रस्तावाचे अवलोकन करून मा.पोलीस अधिक्षक यांनी **अजाबराव दत्ता पायघन, वय ४५ वर्ष रा.अंजनखेडा ता. जि.वाशिम** यांचा प्रस्ताव मा. जिल्हादंडाधिकारी सो श्रीमती बुवनेश्वरी एस. यांचे समक्ष सादर केला.

मा. जिल्हादंडाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांनी सादर प्रस्तावाचे बारकाईने व कायद्याच्या तरतुदीचे योग्य अवलोकन करून प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला. शासनाकडुन सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्याने दिनांक ०५.०३.२०२४ रोजीचे आदेशाने अनुषंगाने **अजाबराव दत्ता पायघन, वय ४५ वर्ष रा.अंजनखेडा ता. जि. वाशिम** याचेविरूद्ध दिनांक ०५.०३.२०२४ रोजी स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले.

मा. पोलीस अधिक्षक श्री. अनुज तारे यांनी जनतेस आवाहन केले की, वाशिम जिल्हयात अशा प्रकारचे गुंडगिरी करणारे,अवैध धंदे करणाऱ्या इसमाविरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल. सन २०२१ मधील ०५ स्थानबध्दतेच्या कारवाया सन २०२२ मधील ०४ कारवाया तसेच सन २०२३ मध्ये ०५ स्थानबध्दतेच्या कारवाया केल्या असुन यापुढेही कार्यवाही सत्र असेच सुरु राहणार असल्याचे संदेश मा.पोलीस अधिक्षक श्री. अनुज तारे यांनी दिलेले आहेत.

सदर स्थानबध्दतेचा प्रस्ताव तयार करण्यासाठी मा. पोलीस अधिक्षक श्री अनुज तारे, अपर पोलीस अधिक्षक श्री.भारत तांगडे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.सुनिलकुमार पुजारी, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण महल्ले, पोलीस निरिक्षक प्रतिबंधक सेल प्रदीप परदेशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश बांगर पो.स्टे.वाशिम ग्रामीण, पोलीस उप निरीक्षक शब्बीर खान पठाण, पोहेकॉ विनोद सुर्वे, दिपक सोनोने, प्रशांत राजगुरु, अमोल इंगोले, पो.शि.विजय नागरे यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधिक्षक,कार्यालय वाशिम**